दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र |सोमवार, 10 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 93 |वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# उपवर्गीकरणाच्या विरोधात परळीत
# आज निळा जनसागर उसळणार

## आनंदराज आंबेडकर , बबनराव घोलप यांच्यासह अनेक मान्यवरांची असणार उपस्थिती

■ परळी( प्रतिनिधी)

अनुसूचित जाती मध्ये उपवर्रगीकरण करण्यासाठी संविधान बाह्य अनंत बदर समिती बरखास्त करा, होऊ घातलेले उपवर्गीकरण रद्द करा, खाजगी आस्थापनांमध्ये आरक्षण लागू करा या व इतर मागण्यांसाठी आज दिनांक 10 ऑगस्ट रोजी परळीत होणाऱ्या महामोर्चासाठी निळा जनसागर उसळणार आहे. रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या महामोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



10 ऑगस्ट रोजी सकाळी 11 वाजता परळीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून या मोर्चास सुरवात होईल. रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या या महामोर्चात प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांच्यासह 59 जातीतील प्रमुख मान्यवर पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

मोर्चा सकाळी 11 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघाल्यानंतर साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक येथे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करून पुढे रेल्वे स्टेशन येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून , एक मिनार चौक,रेल्वे उड्डाणपूल, फुले नगर, सिद्धार्थनगर, भिमवाडी रोडे चौक, राणी लक्ष्मीबाई टावर मार्गे मोंढा मार्केट येथे पोहोचणार आहे तेथे या महामोर्चाचे भव्यसभेत रूपांतर होईल तसेच याच ठिकाणी मोर्चाच्या वतीने शासनाला महिलांच्या हस्ते निवेदन देण्यात येईल.

महाराष्ट्रात अनुसूचित जाती मध्ये 59 जातींना अनुसूचित जाती मध्ये आरक्षणाचा लाभ मिळतो. 26 जानेवारी 1950 भारतीय राज्यघटनेचे अंमलबजावणी सुरू झाल्यापासून आरक्षण सर्वांसाठी समान पातळीवर संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपलब्ध करून दिलेले आहे. उपवर्रगीकरण झाले तर या जातींमध्ये फुट निर्माण होईल तसेच आरक्षणालाही धोका निर्माण होणार आहे.म्हणूनच अनुसूचित जातीतील ऐक्य अबाधित रहावे व सरकारचे मनसुबे उधळून लावण्यासाठी 10 ऑगस्ट रोजी परळी वैजनाथ येथील या महामोर्चास परळी तालुक्यातील अनुसूचित जातीतील नेते,कार्यकर्ते, महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समिती परळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान मोर्चाच्या पार्श्वभूमीवर परळी शहर सज्ज झाले आहे.शहरातील प्रमुख चौकात भव्य बॅनर आणि कमानी लावण्यात आले आहेत पूर्ण शहरात प्रमुख रस्त्यावर निळे आणि पंचशील ध्वज फडकताना दिसत आहेत. मोर्चासाठी हजारोंच्या संख्येने आंबेडकर अनुयायी उपस्थित राहणार असल्याने पोलिसांकडून चौक बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे.




नीळ वादळ आज परळीत

# खा. बजरंग सोनवणेंच्या तक्रारीनंतर बीड जिल्हा कारागृह प्रशासनाला जाग

## सुरक्षा तपासणीसाठी अत्याधुनिक कारागृहात 'स्कॅनर' दाखल

■ बीड प्रतिनिधी

बीड जिल्हा कारागृहातील ढिसाळ कारभार, कैद्यांना मिळणारी व्हीआयपी वागणूक आणि गैरप्रकारांविरोधात खा. बजरंग सोनवणे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली होती. या भेटीनंतर अवघ्या काही दिवसांतच कारागृह प्रशासनाला जाग आली असून, परिसरात गांजा, मोबाईल आणि इतर बेकायदेशीर वस्तूंच्या प्रवेशाला चाप लावण्यासाठी अत्याधुनिक 'हायटेक' तपासणी यंत्रणा बसवण्यात आली आहे.

बीड जिल्हा कारागृहात काही ठराविक कैद्यांना नियमांचे उल्लंघन करून विशेष सवलती दिल्या जात असल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या होत्या. कारागृहात मोबाईलचा वापर, बंदी असलेल्या वस्तूंची सहज उपलब्धता आणि अधिकाऱ्यांची संशयास्पद भूमिका यांवरून खा. सोनवणे यांनी ३ ऑगस्ट रोजी दिल्लीत गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. या प्रकरणी गृहमंत्र्यांनी तातडीने कारवाईचे आश्वासन दिले होते.



गृहमंत्र्यांकडे तक्रार झाल्यानंतर चक्रे वेगाने फिरली असून, बीड कारागृहात आता डिजिटल निगराणी आणि कडक सुरक्षेसाठी अत्याधुनिक साधने बसवण्यात आली आहेत. यात

बॅगेज स्कॅनर मशीन: कारागृहात येणाऱ्या प्रत्येक वस्तू आणि बॅगची बारकाईने तपासणी करण्यासाठी.

डोर फ्रेम मेटल डिटेक्टर: मुख्य प्रवेशद्वारावर संशयित धातू अथवा वस्तू शोधण्यासाठी. हँड हेल्ड मेटल डिटेक्टर: वैयक्तिक शारीरिक तपासणीसाठी असेल. कारागृहासारख्या संवेदनशील ठिकाणी होणाऱ्या गैरप्रकारांमुळे न्यायप्रणालीवरील सामान्य जनतेचा विश्वास ढळू नये, यासाठी स्वतंत्र प्राधिकरणाद्वारे चौकशीची मागणी अजूनही कायम आहे. मात्र, नव्या उपकरणांच्या आगमनामुळे आता बेकायदेशीर वस्तूंच्या थेट प्रवेशाला पूर्णपणे बंदी घालणे शक्य होणार आहे. गृह मंत्रालयाच्या हस्तक्षेपानंतर स्थानिक प्रशासनाने दाखवलेल्या या तत्परतेमुळे बीड कारागृहातील 'व्हीआयपी संस्कृती'ला ब्रेक लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.






## बैलाविना शेतीला मजा नाही!

रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी-बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय सुद्धा सुरक्षित राहतात.

आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे. आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.



# मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे नुतन अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, महासचिव संदीप लाहोटी यांचा सत्कार उत्साहात

## व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध- सुरेंद्र रेदासणी ; व्यापाऱ्यांची एकता हीच आपली शक्ती- संदीप लाहोटी

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

व्यापारी वर्गाची अतिशय महत्वाची संघटना अशी ओळख असलेल्या मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यात अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासणी, महासचिवपदी संदीप लाहोटी यांची निवड झाल्याबद्दल परळी वैजनाथ विविध व्यापारी महासंघाच्यावतीने भव्य सत्कार उत्साहात संपन्न झाला. व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत अशी ग्वाही नुतन अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांनी दिली तर व्यापाऱ्यांची एकता हीच आपली शक्ती असल्याचे प्रतिपादन नुतन महासचिव संदीप लाहोटी यांनी केले. यावेळी शहरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रद्धा मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या सत्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विनोद सामत, परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष रतन कोठारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयपाल लाहोटी व सुरेश मुंडे, न. प. बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, न. प. सभापती सौ. अंजली लोखंडे, वैद्यनाथ बँकेचे माजी चेअरमन अशोक जैन, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे नुतन सचिव जाफर मिर्झा, सहसचिव धनंजय जेवरीकर, परळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड आदींची उपस्थिती होती.











प्रारंभी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कु. प्रतिक्षा कस्तुरे हिने स्वागत गीत सादर केले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी व महासचिव संदीप लाहोटी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना सुरेंद्र रेदासणी म्हणाले की, मराठवाडा जशी संताची भूमी आहे तसा विविध उद्योगाची जननी आहे. अनेक उद्योग आहेत. त्यामुळे व्यापाराचे मोठे जाळे आहे. व्यापाऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी आम्ही संघटनात्मक प्रयत्न करणार आहोत. मी बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करणारा आहे. चांगले काम करून आपल्या जिल्ह्याचा नावलौकिक वाढविणा असल्याचे सांगून निवडीनंतर पहिला सत्कार येथे होत असुन मी भारावून गेलो आहे. यावेळी संदीप लाहोटी म्हणाले की, मराठवाडा चेंबर्स ऑफ ट्रेड अँड कॉमर्स ही व्यापाऱ्यांच्या प्रश्नावर काम करणारे संघटन आहे. आपली एकी हीच आपली ताकद आहे त्यामुळे आपण आपले ऐक्य महत्त्वाचे आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी आपण प्रयत्न करू असे सांगून आपल्या प्रेमाचा कायम ऋणी राहणार असल्याचे सांगितले.

नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी म्हणाल्या की, व्यापारी हे केवळ व्यावसायिक नसून आर्थिक कणा आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवून व्यवसाय वाढवण्यासाठी नगर परिषद कायम सोबत राहिल अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी जुगलकिशोर लोहिया, माऊली फड, प्रा. पवन मुंडे, बंडू गरुड आदींची भाषणे झाली. यावेळी परळीकरांच्या वतीने नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी व बाजीराव धर्माधिकारी यांनी सुरेंद्र रेदासणी आणि संदीप लाहोटी यांचा सत्कार केला. पुरस्कार मिळाल्याबद्दल वैजनाथ कोल्हे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाळ कंकाळ यांनी केले. संचलन महेश मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन नंदलाल बियाणी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी व्यापारी महासंघाचे सर्वश्री माऊली दादा फड, बंडू सेठ गरुड, विष्णू देवशेठवार, नंदू शेठ बियाणी, विष्णु देवशेठवार, जगदीश लड्डा, जयप्रकाश लड्डा, नितीन अग्रवाल, सुरेश आण्णा टाक, शंकर आडेपवार, उद्धव फड, गोपाळ कंकाळ आदींनी परिश्रम घेतले.

# युपीएससी मध्ये पहिल्याच प्रयत्नात यश

## ना. पंकजाताई मुंडे यांनी केले गाढे पिंपळगावच्या चैतन्य राडकरचे अभिनंदन

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश संपादन करणाऱ्या गाढे पिंपळगाव येथील चैतन्य सुभाष राडकर याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

चैतन्यचे वडील सुभाष रांडकर यांच्याशी फोनवर संपर्क साधून ना. पंकजाताई मुंडे यांनी चैतन्य ला मनापासून शुभेच्छा दिल्या. यासंदर्भात एक ट्विटही त्यांनी केले आहे.






माझ्या मतदारसंघातील गाढे पिंपळगाव ता. परळी वैजनाथ जि. बीड येथील शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी चैतन्य सुभाष राडकर याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील (CAPF) असिस्टंट कमांडंट पदासाठीच्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. त्याची असिस्टंट कमांडंट म्हणून नियुक्ती झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील तरूणांसाठी प्रेरणादायी आहे. चैतन्य..तुझे मनःपूर्वक अभिनंदन..! अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती निमित्त मंगळवारी 11 ऑगस्ट रोजी जगमित्र नागा मंदिरात बैठकीचे आयोजन

■ परळी/प्रतिनिधी



राष्ट्रसंत, वैराग्यमूर्ती भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त परळी शहरातील जगमित्र नागा मंदिरात मंगळवार दिनांक 11 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6 वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

वैराग्यमूर्ती, राष्ट्रसंत भगवान बाबा यांचा जयंती उत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही परळी शहरात जयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत कार्यक्रमांचे नियोजन, पदाधिकाऱ्यांच्या निवडी, आगामी रणनीतीबाबत सामूहिक चर्चा होणार आहे. मंगळवार दिनांक 11 ऑगस्ट रोजी परळी शहरातील जगमित्र नागा मंदिरात सायंकाळी 6 वाजता बैठक होणार आहे तरी या बैठकीस सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले.

# भारताच्या भविष्यातील विकासाचे मुख्य केंद्र नवी मुंबईच 'मेघालय भवन'विकास संस्कृती आणि एकात्मतेचा संगम

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : 'मेघालय भवन' उभारणीसाठी जमीन हस्तांतरण व भूमीपूजन सोहळा संपन्न

■ नवी मुंबई वृत्तसंस्था




महाराष्ट्र आणि ईशान्य भारतातील मेघालय ही केवळ दोन राज्ये नसून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणारी सहोदर राज्ये आहेत, अशा शब्दांत गौरव उद्गार काढत महाराष्ट्र आणि मेघालय यांच्यातील सांस्कृतिक व आर्थिक नाते अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. खारघर येथील प्लॉट नंबर १४, सेक्टर १६ येथे आयोजित 'मेघालय भवन' च्या जमीन हस्तांतरण व भूमिपूजन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. नवी मुंबई, ठाणे आणि रायगड हा संपूर्ण परिसर देशाच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेला मोठी गती देणार असून, हाच परिसर भारताच्या विकासाचे पुढील मुख्य केंद्र ठरणार आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या सोहळ्याप्रसंगी मेघालय राज्याचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा, मेघालय राज्याचे उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग, मेघालय राज्याचे सामान्य प्रशासन विभाग मंत्री सोस्थेनिस सोहतुन यांच्यासह खासदार मिलिंद देवरा, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, मेघालय राज्याचे मुख्य सचिव शकील अहमद, मेघालय राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाचे आयुक्त व सचिव सिरिल व्ही. डी. डिएंगडोह, कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सिडकोचे मुख्य महाव्यवस्थापक अश्विन मुद्गल, सिडकोचे सहव्यवस्थापक राजा दयानिधी, सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, पनवेल प्रांतअधिकारी पवन चांडक, तहसिलदार मिनल भामरे, तसेच मेघालय राज्यातील महाराष्ट्रात राहणारे विद्यार्थी आणि नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र आणि मेघालय या दोन्ही राज्यांच्या राज्यगीताने या सोहळयाचा प्रारंभ करण्यात आला. मेघालय राज्यातील जगप्रसिध्द पारंपारिक नृत्य शैलीत मेघालयीन कलाकारांनी सादरीकरण केले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांच्याकडे मेघालय भवनसाठीच्या जमिनीची कागदपत्रे हस्तांतरीत करण्यात आली. या सोहळ्यात उपस्थितांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन्ही राज्यांमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अनुबंधांवर प्रकाश टाकला. ईशान्य भारतातील विद्यार्थी, कलाकार आणि संगीत क्षेत्रातील दिग्गजांसाठी मुंबई व पुणे ही अत्यंत पसंतीची ठिकाणे आहेत. विशेषतः मेघालयच्या आत्म्यात वसलेल्या संगीताचा मुंबईच्या संगीत जगताशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यामुळेच खारघरसारख्या मोक्याच्या ठिकाणी आकारास येणारे हे मेघालय भवन केवळ एक इमारत नसून, मेघालयातून शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारांसाठी किंवा कला सादरीकरणासाठी येणाऱ्या नागरीक व विद्यार्थ्यांसाठी हक्काचे घर ठरेल. नवी मुंबई परिसराच्या होत असलेल्या अभूतपूर्व विकासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, या भागात जागतिक दर्जाच्या 12अव्वल विद्यापीठांचा समावेश असणारी 'एज्यु-सिटी' आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची 'मेडी-सिटी' उभारली जात आहे. सोबतच देशातील 60 टक्के डेटा सेंटर क्षमता याच परिसरात निर्माण होत असून, हे क्षेत्र न्यू-एज आणि डीप-टेक उद्योगांचे केंद्र बनत आहे. पुढील 10 ते 15 वर्षांत जेव्हा मेघालयचे नागरिक या वास्तूचा वापर करतील, तेव्हा या नियोजित आणि भविष्याभिमुख जागेचे महत्त्व त्यांना अधिक स्पष्टपणे जाणवेल. मेघालय भवनाचे बांधकाम लवकरात लवकर आणि उत्कृष्ट दर्जात पूर्ण करण्यासाठी सिडको किंवा राज्य सरकारच्या यंत्रणांमार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मेघालयचे माजी मुख्यमंत्री व लोकसभेचे माजी अध्यक्ष कै. पी. ए. संगमा यांच्या संसदेतील अतुलनीय योगदानाचे भावूक स्मरण केले. अत्यंत खडतर राजकीय परिस्थितीतही चेहऱ्यावर हास्य ठेवून त्यांनी देशाची संसद कुशलतेने चालवली. त्यांचाच वारसा पुढे नेत मेघालयचे तरुण व गतिमान मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी गेल्या 6 ते 7 वर्षांत मेघालय राज्याची अर्थव्यवस्था दुप्पट केली आहे, अशा शब्दांत त्यांनी संगमा यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. केवळ या भवनापुरते मर्यादित न राहता, येत्या काळात महाराष्ट्र आणि मेघालय हे दोन्ही राज्ये संस्कृती आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्याने अधिक वेगाने पुढे जातील, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

नवी मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी 'मेघालय भवन'साठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडको आणि स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांचे विशेष आभार मानले. मुंबईत उपचारासाठी येणारे रुग्ण, विद्यार्थी आणि व्यावसायिकांची वाढती संख्या पाहता जुन्या मेघालय भवनमध्ये जागेची मोठी अडचण भासत होती. नीती आयोगाच्या बैठकीत संगमा यांनी विनंती करताच अवघ्या काही सेकंदांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जमिनीचा प्रस्ताव मान्य केला. या उपक्रमाला त्यांनी पूर्व आणि पश्चिम भारताला जोडणारा आणि देशाच्या एकात्मतेला अधिक बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा मानला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच ईशान्य भारतातील राज्ये आज देशात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनली असल्याचे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रासोबतचे जुने संबंध आठवत संगमा यांनी आगामी काळात व्यापार, कृषी आणि संस्कृतीच्या क्षेत्रात भागीदारी अधिक मजबूत करण्याचा विश्वास व्यक्त केला. विशेषतः मेघालयची जगप्रसिद्ध 'लाखडोंग हळद', क्रीडा क्षेत्र आणि तेथील समृद्ध संगीत परंपरा मुंबई व महाराष्ट्राच्या माध्यमातून जगभरात पोहोचवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

## नवी मुंबई महापालिकेत विविध नागरी सुविधा कामांना मंजुरी ; स्थायी समितीचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ नवी मुंबई वृत्तसंस्था

नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत प्रशासनाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या विविध नागरी विकासप्रस्तावांना सभापती अशोक भाऊसो पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यामध्ये पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते-पदपथ दुरुस्ती आणि शहर सुशोभिकरणाच्या अनेक महत्त्वपूर्ण कामांचा समावेश आहे.

केंद्र सरकारच्या 'अमृत २.०' अभियानातील 'जल ही अमृत' उपक्रमांतर्गत ५-स्टार मानांकन व ८ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेल्या सेक्टर ५० नेरूळ येथील १०० द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रात नवीन पंपिंग मशीन बसविण्यास व अनुषांगिक कामांना मान्यता देण्यात आली. तसेच सानपाडा सेक्टर २० येथे पावसाळ्यात समुद्राचे पाणी शहरात शिरू नये यासाठी प्लम कॉंक्रिट करून ९०० मि.मी.चे फ्लॅप गेट बसविण्याच्या २८ लाख ११ हजार रुपयांच्या कामाला मंजुरी मिळाली. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी सीबीडी बेलापूर सेक्टर २८ मधील पंपहाऊसमधील ५ नव्या ३३ केव्ही इनडोअर फिडर पॅनल्सच्या सुरक्षिततेसाठी रूम बांधण्यासाठी ८५ लाख ९९ हजार रुपये मंजूर करण्यात आले. याशिवाय वाशी सेक्टर १६ येथे मुख्य जलवाहिनीवर क्लोरिन युनिट प्लांट उभारण्यासाठी २५ लाख ८ हजार रुपये आणि पावणे गावाजवळ ठाणे-बेलापूर रस्त्यावरील ८०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी बदलण्यासाठी ३३ लाख ७९ हजार रुपयांच्या कामास मान्यता देण्यात आली. पर्यटन व सुशोभिकरणाच्या दृष्टीने नेरूळ सेक्टर २१ येथील प्रसिद्ध 'रॉक गार्डन'मधील अंतर्गत पदपथ, गझेबो व भिंतींच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ७३ लाख रुपये, तर ठाणे-बेलापूर रस्त्यावर महापे ब्रिज ते दिघा दरम्यान शहर सुशोभिकरणासाठी १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपूर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## दाऊतपूर येथे उद्यापासून भव्य श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

# महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची मांदियाळी; श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन



परळी | प्रतिनिधी

परळी तालुक्यातील दाऊतपूर येथे श्री सिद्धेश्वर यात्रा महोत्सवानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, या सप्ताहास उद्यापासून सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात प्रारंभ होत आहे. सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने तसेच संगीतमय श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम होणार असून, दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज साठे (धारूर) यांच्या अमृतमय वाणीतून संगीतमय शिवमहापुराण कथा होणार आहे. तसेच विविध दिवशी नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे.

यामध्ये ह.भ.प. श्री विलास महाराज गेजगे (गंगाखेड), ह.भ.प. श्री अक्षय महाराज पिंगळे (बीड), ह.भ.प. श्री संतोष महाराज वनवे (बीड), ह.भ.प. श्री शिवाजी महाराज बावस्कर , ह.भ.प. कांचनताई शेळके,पुसद ह.भ.प.बाळु महाराज गिरगावर,आकाश कृष्णकांत शास्त्री,यांचे किर्तन दुपारी सत्रात १ते३ या वेळेत किर्तन होईल परत रात्री ह.भ.प. सोपान महाराज सानप शास्त्री (हिंगोली) आदी मान्यवर कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. यात्रेच्या निमित्ताने महिला भजनी मंडळांचे भजन, सकाळची पंगत तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे दाऊतपूर व परिसरातील भाविकांसाठी हा सप्ताह भक्तिमय पर्वणी ठरणार आहे.

सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी सप्ताहाची सांगता होणार असून, यावेळी श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज साठे (धारूर) यांचे काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

दरम्यान, या संपूर्ण धार्मिक सोहळ्याचा परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन दाऊतपूरचे सरपंच श्रीकांत फड, बालू मामा मुंडे तसेच ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी अव्हाण केले आहे.

**स्थळ : श्री सिद्धेश्वर मंदिर, दाऊतपूर, ता. परळी वैजनाथ, जि. बीड.**
**"समस्त गावकरी मंडळी व श्री सिद्धेश्वर यात्रा महोत्सव कमिटी, दाऊतपूर" यांच्या वतीने या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

# शेतकऱ्यांची कर्जमाफी, वीज बिल माफी, आणि मराठवाड्यासाठी हक्काचे पाणी हे शासनाचे निर्णय मराठवाड्यासाठी दिलासादायक..

## माझा विजय हा सुरेश धस यांना समर्पित : आ. बसवराज पाटील

## मुख्यमंत्री ग्रामीण पशु उद्योजकता योजनेचा लाभ युवकांनी घ्यावा : आ .सुरेश धस



**आष्टी** | मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी शेती सिंचनासाठी वीज बिल माफी आणि आगामी काळात मराठवाड्याच्या हक्काचे पाणी येणार आहे हे निर्णय दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत दिलासादायक असून विधानपरिषद निवडणुकीतील माझा विजय हा आमदार सुरेश धस यांच्या कल्पक रणनीतीला समर्पित करतो असे प्रतिपादन धाराशिव बीड तथा लातूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघ धाराशिव चे नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील पाटील यांनी केले तर आमदार सुरेश धस यांनी आमदार बसवराज पाटील यांनी दर सहा महिन्याला नगरपरिषद नगरपंचायत नगरपालिका सदस्यांची बैठक आयोजित करून त्यांच्या समस्या दूर कराव्यात असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले नवनिर्वाचित आमदार हे अनुभवी राजकारणी असून त्यांना मंत्रिपदाचा अनुभव आहे सर्वांना बरोबर घेऊन जाणारा नेता अशी त्यांची ख्याती असल्यामुळेच भारतीय जनता पार्टीने त्यांच्यावर ही जबाबदारी दिली आहे वरिष्ठ सभागृहातील सदस्य असल्यामुळे नगरपरिषदांचे नगरपंचायतींच्या नगरपालिकांच्या समस्या या त्यांनी अधिक चांगल्या पद्धतीने अभ्यासून दर सहा महिन्यांनी प्रत्येक नगरपंचायत नगरपरिषद येथे भेट देऊन शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी बैठक घ्यावी आणि नगरसेवकांच्या अडचणी सोडवाव्यात अशी आपली अपेक्षा आहे आमदार बसवराज पाटील यांनी रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजय संपादन केला आहे त्यांना महायुतीच्या सर्व नगरसेवकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनिता ताई पवार यांच्या विश्वासावर बसवराज पाटील यांना मतदान केले आहे असे सांगून महाराष्ट्र शासनाच्या क्रांतिकारी निर्णय ठरणाऱ्या मुख्यमंत्री ग्रामीण पशु उद्योजकता योजने चे ऑनलाईन फॉर्म सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ भरून लाभ घ्यावा या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने साडेचार हजार कोटी रुपये तरतूद केली आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथे आमदार सुरेश धस यांनी नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील यांच्या सत्कार सोहळ्यामध्ये सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर आमदार प्रकाश सोळंके माजी आमदार बदामराव पंडित बाबुराव पोटभरे राजाभाऊ मुंडे डॉक्टर स्वरूप सिंह हजारी सहल चाऊस हरवून इनामदार विठ्ठलराव बडोले रामराव गीते दिलीप भालेराव शेख निजाम मोईन मास्टर परशुराम गुरखुदे शेख मुजीब रणवीर पंडित आदी उपस्थित होते उपस्थित होते पुढे बोलताना बसवराज पाटील म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने अत्यंत लोकहिताचे शेतकरी हिताचे निर्णय घेतले असून 36000 कोटी रुपयांचे कर्जमाफी



शेतकऱ्यांना शेतीसाठी विज बिल माफी त्यामध्ये चाळीस हजार कोटी रुपये आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सतत दुष्काळग्रस्त असलेल्या मराठवाड्यासाठी हक्काचे आणि आणि अतिरिक्त 32 टीएमसी पाणी मराठवाड्यासाठी उपलब्ध होणार आहे हे निर्णय शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारक ठरणार आहेत अशा प्रकारचे निर्णय यापूर्वीच्या सरकारने घेतलेले नाहीत असे सांगत निवडणुकीच्या विजयाचे श्रेय आमदार सुरेश धस यांना समर्पित करतो कारण त्यांनी आखलेल्या रणनीतीमुळे बीड जिल्ह्यात केवळ एक मत माझ्या विरोधात जाऊन 303 मते मला मिळाली आहेत त्यामुळे माझ्या विजयाचे सर्व श्रेय आमदार सुरेश धस यांना देत असल्याचे सांगितले यावेळी बोलताना प्रकाश सोळंके म्हणाले की दुष्काळ आणि अतिवृष्टी मुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नगरपंचायत आणि नगरपरिषद क्षेत्रामध्ये लाभ मिळत नाही यावर ठोस उपाययोजना करून या क्षेत्रातही शासनाच्या मदतीचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी नवनिर्वाचित आमदारांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले माजी आमदार बदामराव पंडित यांनी महायुती शासनातील शेतकरी हिताचे प्रश्न नवनिर्वाचित आमदारांनी प्रभावीपणे मांडावीत असे आवाहन केले यावेळी बोलताना बहुजन विकास मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी तडाखे बंद भाषणामध्ये गोरगरिबांचा नेता सर्वांना न्याय देणारा नेता म्हणजे आमदार सुरेश धस आहेत असे सांगितले

यावेळी ज्येष्ठ नगरसेवक मोईन मास्टर म्हणाले की, "आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आम्ही मते दिली. त्यांच्यासारखा सक्षम सारथी आणि पाठीराखा मिळाल्याने विकासाची दिशा अधिक मजबूत झाली आहे."

ज्येष्ठ नेते राजाभाऊ मुंडे यांनी आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना, "उगवत्या सूर्याप्रमाणे त्यांचे नेतृत्व आहे. माणसे जोडण्याची चांगली पारख सुरेश धस यांना आहे. आता पुढील काळात वारसा नव्हे, तर काम आणि नेतृत्वाची क्षमता पाहून नेतृत्व निवडले जाते," असे मत व्यक्त केले.

माजी आमदार बदामराव पंडित यांनीही आमदार धस यांचा 'लोकनेते' असा उल्लेख करत त्यांच्या नेतृत्वाची प्रशंसा केली. नगरसेवक व नगराध्यक्षांना मानधन मिळाले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. बीड जिल्ह्यातील विजयी उमेदवार बसवराज पाटील यांना सर्वाधिक मतदान मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

"धस मंत्री होईपर्यंत फेटा बांधणार नाही"

रामराव गिते यांनी आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वावर असलेला विश्वास व्यक्त करत, "सुरेश आण्णा धस जोपर्यंत मंत्री होत नाहीत, तोपर्यंत फेटा बांधणार नाही," अशी भावना व्यक्त केली. त्यांच्या नेतृत्वाला मिळणारा जनसमर्थनाचा हा मोठा दाखला असल्याचे त्यांनी सांगितले

या कार्यक्रमास आमदार प्रकाशदादा सोळंके, माजी मंत्री बदामराव आबा पंडित साहेब, मा. बाबुराव पोटभरे साहेब (बहुजन विकास मोर्चा), मा. राजाभाऊ अण्णा मुंडे (जेष्ठ नेते), मा. डॉ. स्वरूपसिंह हजारी, मा. सहालभाई चाऊस (माजलगाव नगरपरिषद), मा. हरुण ईनामदार (केज नगरपरिषद), मा. विठ्ठलराव बडोले (संचालक, मु. कारखाना), मा. प्रकाश आष्टे (माजी गटनेते), मा. दिलीप भालेराव (जिल्हाध्यक्ष अनुसूचित मोर्चा, धाराशिव), मा. रामराव गीते, हुले आप्पा, मा. मोईन मास्टर (ज्येष्ठ नगरपरिषद नेते), मा. निजामभाई (बीड, नगरपरिषद), सौ. प्रेमलताताई पारवे (नगराध्यक्षा, बीड), सौ. संगीताताई बनसोड (केज),मा. शेख मुजीब भाई, मा. परशुराम गुरखुदे, श्री. बाळासाहेब साहेब जाधव (धारूर), श्री. शेषेराव बापू जगताप (वडवणी), रणजीतसिंह पंडित,श्री. रोहिदास गाडेकर (शिरूर), मा. झिया बेग, मा. राजू जाधव यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रियदर्शनी क्रिडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने अंबाजोगाईत

# लोकनेते विलासरावजी देशमुख व लोकनेते बाबुरावजी आडसकर स्मृती सदभावना समारोहाचे 13, 14 व 15 ऑगस्ट रोजी आयोजन

## ह .भ .प .निवृत्ती महाराज इंदोरीकर देशमुख यांचे किर्तन

## दिव्यांग विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य वाटप तसेच वृक्षारोपण

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**



मराठवाड्याचे सुपुत्र लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या चौदाव्या व लोकनेते बाबुरावजी आडसकर यांच्या दहाव्या स्मृती दिनानिमित्त प्रियदर्शनी क्रिडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळ, अंबाजोगाई यांच्या वतीने शहरात दिनांक 13, 14 व 15 ऑगस्ट 2026 रोजी स्मृती सदभावना समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारोहात लोकप्रिय किर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर देशमुख यांचे समाज प्रबोधनपर किर्तन, दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्य वाटप तसेच वृक्षारोपण आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्मृती सदभावना समारोहास अंबाजोगाई परिसरातील नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संयोजक व प्रियदर्शनी क्रिडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

अंबाजोगाईत मागील अनेक वर्षांपासून अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी हे लोकनेते विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सदभावना समारोहाचे आयोजन करीत होते. परंतु, 13 वर्षांपूर्वी लोकनेते विलासरावजी देशमुख यांचे दु:खद निधन झाले. त्यामुळे दरवर्षी मे महिन्यात होणारा सदभावना समारोह मागील 13 वर्षांपासून ऑगस्ट महिन्यात स्मृती सदभावना समारोह म्हणून साजरा केला जातो. यावर्षी लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या चौदाव्या स्मृती दिनानिमित्त व लोकनेते माजी आमदार बाबुरावजी आडसकर यांच्या दहाव्या स्मृती दिनानिमित्त 13, 14 व 15 ऑगस्ट 2026 रोजी सदभावना समारोह आयोजित करण्यात आला आहे. गुरूवार, दिनांक 13 ऑगस्ट रोजी सायंकाळी 5 वाजता राष्ट्रीय किर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर देशमुख यांचे समाज प्रबोधनपर किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक 14 ऑगस्ट 2026 रोजी दिव्यांग विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मानवविकास मूकबधिर विद्यालय येथे सकाळी 11 वाजता शालेय साहित्य आणि गणवेशाचे वाटप करण्यात येणार आहे आणि शनिवार, दिनांक 15 ऑगस्ट रोजी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. प्रसिध्दीपत्रकात राजकिशोर मोदी यांनी नमूद केले आहे की, महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रासाठी बहुमोल योगदान देणाऱ्या लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या चौदाव्या तसेच लोकनेते बाबुरावजी आडसकर यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम आणि प्रबोधनपर किर्तनाच्या माध्यमातून अंबाजोगाईत वैचारीक उत्कर्ष व्हावा, व पर्यावरण संवर्धन व्हावे याच विधायक हेतूने स्मृती सदभावना समारोहाचे आयोजन सातत्याने करण्यात येते. यावर्षी 13, 14 व 15 ऑगस्ट 2026 रोजी होणाऱ्या या समारोहात अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील युवक, महिला भगिनी व नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. सदभावना समारोहाच्या यशस्वितेसाठी संकेत मोदी, सचिन जाधव, विशाल जगताप, शरद काळे, अस्लम शेख, रोहित हुलगुंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

# उद्याच्या भावी पिढीचे भविष्य वाचवण्यासाठी उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात चर्मकार बांधवानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- इंजि एन डी शिंदे

**अंबाजोगाई** | शासनाने होऊ घातलेल्या अनुसूचित जाती उपवर्गीकरणला संपूर्ण राज्यातून मोठया प्रमाणावर विरोध केल्या जात आहे. शासनाच्या अनुसूचित जात उपवर्गीकरनाच्या आडून समान नागरी कायद्या संदर्भातची वाटचाल दिसून येत आहे. जर आज १३% आरक्षण असलेल्या ५९ उपजातींमध्ये उपवर्गीकरन झाले तर प्रत्येक जातीच्या वाट्याला काय येईल? जात उपवर्गीकरणामुळे या जातीमधील युवकांचे तसेच विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होऊन येणारी संपूर्ण भावी पिढी व त्यांचे भविष्य उद्धवस्त होईल अशी भीती व्यक्त करत राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा उपाध्यक्ष इंजि एन डी शिंदे यांनी जर येणारी भावी पिढीचे भविष्य वाचवायचे असेल तर अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरनाच्या महामोर्चात मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. यावेळी त्यांच्या सोबत पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानोबा कांबळे (माऊली) , सामाजिक कार्यकर्ते लिंबाजी खरटमोल पत्रकार गोविंद खरटमोल उपस्थित होते. या महामोर्चात आयु आनंदराज आंबेडकर, सुरेश माने, पप्पु कागदे, बाबुराव पोटभरे, रोहिदास बनसोडे, डी एस नरसिंगे, पंकज काटे, रुक्मिणी ताई लोंढे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी होणार आहेत.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांच्या सूचनेनुसार संपूर्ण राज्यात होत असलेल्या महामोर्चात त्या त्या ठिकाणच्या ढोर, चांभार, मोची व इतर सर्व चर्मकार बांधवानी मोठ्या संख्येने सहभागी होण्याच्या सूचना केल्या आहेत.त्यानुसार मराठवाड्यातील नांदेड, लातूर व अन्य ठिकाणी पार पडलेल्या महामोर्चात चर्मकार बांधव सहभागी झाला होता. सोमवार दि १० व मंगळवार दि ११ रोजी होत असलेल्या परळी व अंबाजोगाई येथील महामोर्चात देखील या भागातील चर्मकार बांधवानी मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन इंजि एन डी शिंदे यांनी केले आहे.

संविधान निर्माते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण व्हावे असा कोठेही उल्लेख केला नाही. त्यांनी अनुसूचित जातीला १३% सरळ आरक्षण दिले आहे. यामध्ये



त्यांनी एकूण ५९ जातींचा समावेश केला आहे. कुठल्याही एका जातीला आरक्षनाचा जास्तीचा फायदा व्हावा किंवा होऊल असे कुठेही समाविष्ट केले नाही. शिका संघटित व्हा व संघर्ष करा या बाबासाहेबांच्या आवाहनाला साद देत जे जास्त शिकले त्यांना आरक्षणाचा लाभ मिळाला . त्यामुळे कोणीही अमुक याच जातीने आरक्षणाचा लाभ मोठया प्रमाणावर घेतला असा गैरसमज करून घेत आपापसात भांडत बसू नये व आपण देखील शिक्षण घेण्यासाठी प्रयत्न करावा असेही मत यावेळी इंजि एन डी शिंदे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले. मातंग समाज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारापासून दुरावत चालल्याची खंत यावेळी शिंदे यांनी व्यक्त केली.

परंपरागत व्यवसायापासून प्रवृत्त करत डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ५९ समाजाला अनुसूचित जातीत सामावून घेतले आहे. यामुळेच दिन दलित तथा अस्पृश्य समाजाला माणसात आणून त्यांना मानवी जीवन उपलब्ध करून दिले आहे. तेव्हा कोणत्याही समाजाने आपसात मतभेद निर्माण न करता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक होण्याचा सल्ला याप्रसंगी इंजि एन डी शिंदे यांनी सर्व समाजबांधवाना दिला आहे. दिला आहे. पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानोबा कांबळे यांनी देखील दि १० रोजी परळी व दि ११ मंगळवार रोजी अंबाजोगाई येथे होत असलेल्या अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात चर्मकार बांधव मोठ्या संख्येने सहभागी होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, सोमवार, 10 ऑगस्ट 2026
Last page

### उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली

# परळीच्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे 14 ऑगस्टला भूमीपूजन

## जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी व मान्यवर राहणार उपस्थित



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

शहराच्या विकासात मैलाचा दगड ठरणाऱ्या आणि ५६५ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन येत्या १४ ऑगस्ट रोजी उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमाची प्रशासनाकडून सध्या तयारी सुरू झाली आहे. शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता ग्रामीण पोलीस ठाण्याजवळ असलेल्या टेकडीवरील मैदानात हा भूमीपूजन कार्यक्रम पार पडणार आहे.उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार १४ ऑगस्टला तर ना. पंकजाताई मुंडे १३ तारखेला परळीत येणार आहेत. कार्यक्रमास आ. धनंजय मुंडे यांच्यासह जिल्हयातील सर्व आमदार, लोकप्रतिनिधी, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

### ना. पंकजाताई मुंडेंचा सिंहाचा वाटा

परळीला पशुवैद्यकीय महाविद्यालय निर्माण करण्यात ना. पंकजाताई मुंडे यांचा सिंहाचा वाटा आहे. या खात्याची मंत्री झाल्यानंतर त्यांनी परळी येथे व त्यावेळचे उप मुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या आग्रहामुळे बारामती येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळीच्या महाविद्यालया साठी ५६४ कोटी ५८ लाख इतका निधी देखील मंजूर केला. आता १४ तारखेला याचे भूमीपूजन होत आहे.

### ४१ हेक्टर जमीनीवर उभे राहणार महाविद्यालय

महाविद्यालय उभारणीसाठी जमीन संपादनाची सर्व कार्यवाही पूर्ण झालेली आहे.परळी तालुक्यातील मौजे लोणी येथील गट क्र. ०७ मधील ८ हेक्टर ८० आर व मौजे परळी येथील स.नं. ४७८ मधील २० हेक्टर आणि अतिरिक्त १३ हेक्टर अशी एकूण ४१ हेक्टर ८० आर जमीन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी प्रदान करण्यात आली आहे. या संदर्भातील शासन मान्यता महसूल व वन विभागाने दिली आहे.

### परळीचा लौकिक वाढेल - ना. पंकजाताई मुंडे

परळीत होणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून मराठवाड्यात एक मोठे शैक्षणिक केंद्र उभारले जाणार असून स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नवे दालन उघडणार आहे. यामुळे पशुसंवर्धन संशोधनासाठी स्वतंत्र प्रक्षेत्र निर्माण होईल. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच शेतकरी व पशुपालकांसाठी तांत्रिक व आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाची जोड असलेले हे महाविद्यालय परळी तालुक्याचे लौकिक वाढवेल. सोबतच राज्याच्या पशूवैद्यकीय क्षेत्राला देखील यामुळे नवी उभारी मिळेल असं ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

# मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे नुतन अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, महासचिव संदीप लाहोटी यांचा सत्कार उत्साहात



व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध- सुरेंद्र रेदासणी



व्यापाऱ्यांची एकता हीच आपली शक्ती- संदीप लाहोटी

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

व्यापारी वर्गाची अतिशय महत्वाची संघटना अशी ओळख असलेल्या मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यात अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासणी, महासचिवपदी संदीप लाहोटी यांची निवड झाल्याबद्दल परळी वैजनाथ विविध व्यापारी महासंघाच्यावतीने भव्य सत्कार उत्साहात संपन्न झाला. व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत अशी ग्वाही नुतन अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांनी दिली तर व्यापाऱ्यांची एकता हीच आपली शक्ती असल्याचे प्रतिपादन नुतन महासचिव संदीप लाहोटी यांनी केले. यावेळी शहरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





श्रद्धा मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या सत्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विनोद सामत, परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष रतन कोठारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयपाल लाहोटी व सुरेश मुंडे, न. प. बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, न. प. सभापती सौ. अंजली लोखंडे, वैद्यनाथ बँकेचे माजी चेअरमन अशोक जैन, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे नुतन सचिव जाफर मिर्झा, सहसचिव धनंजय जेवरीकर, परळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कु. प्रतिक्षा कस्तुरे हिने स्वागत गीत सादर केले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी व महासचिव संदीप लाहोटी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना सुरेंद्र रेदासणी म्हणाले की, मराठवाडा जशी संताची भूमी आहे तसा विविध उद्योगाची जननी आहे. अनेक उद्योग आहेत. त्यामुळे व्यापाराचे मोठे जाळे आहे. व्यापाऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी आम्ही संघटनात्मक प्रयत्न करणार आहोत. मी बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करणारा आहे. चांगले काम करून आपल्या जिल्ह्याचा नावलौकिक वाढविणा असल्याचे सांगून निवडीनंतर पहिला सत्कार येथे होत असुन मी भारावून गेलो आहे. यावेळी संदीप लाहोटी म्हणाले की, मराठवाडा चेंबर्स ऑफ ट्रेड अँड कॉमर्स ही व्यापाऱ्यांच्या प्रश्नावर काम करणारे संघटन आहे. आपली एकी हीच आपली ताकद आहे त्यामुळे आपण आपले ऐक्य महत्त्वाचे आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी आपण प्रयत्न करू असे सांगून आपल्या प्रेमाचा कायम ऋणी राहणार असल्याचे सांगितले.

नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी म्हणाल्या की, व्यापारी हे केवळ व्यावसायिक नसून आर्थिक कणा आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवून व्यवसाय वाढवण्यासाठी नगर परिषद कायम सोबत राहिल अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी जुगलकिशोर लोहिया, माऊली फड, प्रा. पवन मुंडे, बंडू गरुड आदींची भाषणे झाली. यावेळी परळीकरांच्या वतीने नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी व बाजीराव धर्माधिकारी यांनी सुरेंद्र रेदासणी आणि संदीप लाहोटी यांचा सत्कार केला. पुरस्कार मिळाल्याबद्दल वैजनाथ कोल्हे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाळ कंकाळ यांनी केले. संचलन महेश मुंडे यांनी तर आभार प्रदर्शन नंदलाल बियाणी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी व्यापारी महासंघाचे सर्वश्री माऊली दादा फड, बंडू सेठ गरुड, विष्णू देवशेठवार, नंदू शेठ बियाणी, विष्णु देवशेठवार, जगदीश लड्डा, जयप्रकाश लड्डा, नितीन अग्रवाल, सुरेश आण्णा टाक, शंकर आडेपवार, उद्धव फड, गोपाळ कंकाळ आदींनी परिश्रम घेतले.